नवी ... 
CD|851
15 JAN 2019

**स्थानिक स्वराज्य संस्थेस माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत....**

नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई संचलित

१. सेक्टर ५०, नेरूळ, नवी मुंबई, जि.ठाणे.

२. सेक्टर ११, कोपरखैरण, नवी मुंबई, जि.ठाणे

आवक क्र. ६६२ २१।१।१८

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग**

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१८/प्र.क्र.१३९१/एसएम-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक:- २१ डिसेंबर, २०१८

**वाचा -**

१) शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक:नमाशा-२००९/ (४९७/ ०९)/माशि-१, दिनांक ११ जून, २००९.

२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.अमाशा/२०१७-१८/नवी मुंबई/माध्य-ब ३०२/८०६९ व ८०७०, दि.२७/०९/२०१८.

३) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई यांचे पत्र क्र.जा.क्र.नमुंमपा/शि.वि./२४३६ व २४३७/२०१८, दि. १७/११/२०१८.

**प्रस्तावना -**

नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई संचलित सेक्टर ५०, नेरूळ, नवी मुंबई, जि.ठाणे व सेक्टर ११, कोपरखैरण, नवी मुंबई, जि.ठाणे या दोन शाळांना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भ क्र. (२) अन्वये शासनास सादर केला आहे. सदर शाळेस परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई संचलित सेक्टर ५०, नेरूळ, नवी मुंबई, जि.ठाणे (इ. १ ली ते १० वी, प्राथमिक ते माध्यमिक, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) व सेक्टर ११, कोपरखैरण, नवी मुंबई, जि.ठाणे (इ. १ ली ते १० वी, प्राथमिक ते माध्यमिक, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) या दोन शाळांना सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यास खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

I. सदर शाळेचा खर्च महानगरपालिकेने स्वतःच्या उत्पन्नातून /स्वनिधीतून करावा. राज्य शासनावर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कोणत्याही प्रकारचे आर्थिक दायित्व न येता सदर शाळा सुरु करावी.

II. माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांबाबतचे शासनाचे प्रचलित धोरण व निकष यांचे पालन करणे तसेच शाळेमध्ये आवश्यक वर्गखोल्या, सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे अनिवार्य राहील.

III. शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

IV. परवानगी दिलेल्या शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या भरती संदर्भात शासनाचे प्रचलित आदेश, नियम व धोरण लागू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा.वि.कुडले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई.
६. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद (प्राथमिक / माध्यमिक), ठाणे.
७. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई.
८. निवडनस्ती (एसएम २)